# १७ . मित्र

ही गोष्ट २ मित्रांची आहे . एकाचे नाव असते रमेश व दुस–याचे नाव असते सुरेश . लहानपणापासूनची त्यांची मैत्री असते . दोघांनाही रानावनात , द–याखो–यात फिरण्याची हौस असते . एकदा रविवारी ते दोघे भटकंतीला निघतात . दुपार होते . काहीतरी बोलाचाली दोघांच्यात होते . सुरेश तापट असतो . तो चटकन रमेशच्या थोबाडीत मारतो . रमेश काही बोलत नाही . तो बाजूच्या शेतात उतरतो व काठीने ओल्या मातीत लिहतो की ' आज मला माझ्या जिवलग मित्राने थोबाडीत मारली .'

दुपारचे जेवण घेऊन ते पुढे चालू लागतात . चालता चालता रमेश घसरतो . सुरेश चपळाई करून त्याला वाचवतो . पुढे जाण्यापूर्वी रमेश त्याचे आभार मानतोच परंतु चटकन् बॅगेतील खीळा काढून बाजूच्या दगडावर सुरेशचे नाव कोरतो .

संध्याकाळी दोघेजण मुक्कामाला पोचतात . सुरेश जरा अपसेटच असतो . सुरेश रमेशचा हात धरतो व विचारतो कि मित्रा मी तुला थोबाडीत मारली तर माझे नाव तू मातीत लिहलेस व मी जेव्हा तुला वाचवले तेव्हा माझे नाव तू दगडावर कोरलेस . तुला नेमके काय सुचवायचे आहे ?

काय मित्रांनो तुम्हाला काय वाटते ? काय उत्तर रमेशने दिले असेल ?

रमेश सांगतो कि लहानपणापासून आपण वेगवेगळया परिस्थितीत , संस्कारात , लोकांच्यात लहानाचे मोठे होतो . कधी गोष्टी मनासारख्या घडतात तर कधी मनाविरूद्ध . परिस्थिती रोजच बदलते . आपला स्वभाव बदलतो . लोकांची दृष्टी बदलते . मते बदलतात . ह्या सर्व मतमतांतराच्या गुंत्यात आपण जर तारतम्य पाळले तर आपला जीवनप्रवास सुखकर होतो .

जेव्हा जेव्हा आपला अपमान होतो , आपल्याला दुस–याचा राग येतो तेव्हा या आठवणी जेवढया लवकर विसरता येतील तेव्हढया लवकर विसरल्या पाहिजेत . परंतु जर का कोणी अगदी थोडीसुद्धा मदत केली तर मात्र त्याचे उपकार आयुष्यभर लक्षात ठेवले पाहिजेत व आपणही दुस–याला शक्यतो मदत करून उपकाराचे ओझे हलके करण्याचा प्रयत्न केला पाहिजे .

किती छान विचार आहेत नाही !!!